पुढारी

# पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी परीक्षांचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग, तसेच संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठीची प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा १३ व १५ सप्टेंबर दरम्यान कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव या जिल्ह्यांतील एकूण ११ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

रविवारी (दि. १२) एम.ए. मास कम्युनिकेशन, एम.सी.ए., एम.ए./एम.एस्सी. जिऑग्राफी, एम.एस. डब्ल्यू- रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट, एम. एस्सी. (जिऑलॉजी / अॅग्रो केमिकल अॅन्ड पेस्ट मॅनेजमेंट / नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी / स्टॅटिस्टिक्स अॅप्लाईड स्टॅटिस्टिक्स अॅन्ड इन्फरमेशन / बॉटनी / इलेक्ट्रॉनिक्स / कॉम्प्युटर सायन्स), बी.लिब. सायन्स अॅन्ड इन्फरमेशन सायन्स, एम.जे., बी.जे., अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पार पडल्या. एकूण २,६६१ विद्यार्थ्यांपैकी २,११८ इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्परीक्षा (दि. १६) घेण्याचे विद्यापीठ प्रशासनाने प्रयोजले आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वतःचा ई-मेल तसेच नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून पुढील कार्यवाही करावी



शिवाजी विद्यापीठातून...

अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू झालेली नाही, त्यांनी मॉक टेस्ट द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

सकाळ

# भारतीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाच्या अनेक संधी

## राजगुरू : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : ''शिक्षणातील स्पर्धात्मक वातावरणामध्ये भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणाच्या अनेक संधी असून, याचा लाभ घेण्यासाठी प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे,' असे सलिल राजगुरू यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे 'परदेशी शिक्षणातील संधी व प्रक्रिया' यावर एकदिवसीय व्याख्यानमाला झाली. प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

राजगुरू म्हणाले, ''शिक्षण क्षेत्रात बदल घडत आहेत. यातून परदेशातून शिक्षण घेण्याची अनेक विद्यार्थ्यांची इच्छा असते; परंतु आपल्या विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्या काही प्रमाणात आर्थिक उभारणीबाबत, परदेशी संस्थांच्या शोधाबाबत तसेच हे शिक्षण घेतल्यानंतर करिअर कसे असेल या संदर्भात असतात. अशावेळी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन गरजेचे आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी अनेक परदेशी शिक्षणाच्या संधी असून, आपल्या परिपूर्ण ज्ञानाचा उपयोग करून परदेशातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. शासन विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणासाठी प्रोत्साहन देत असून, आपल्या देशातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण देण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. शासकीय योजनांचा फायदा घेत परदेशी शिक्षण घेऊ शकता.' महेश चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. अतुल एतावडेकर यांनी परिचय करून दिला.

सकाळ

# उमाजी नाईक यांची जयंती

कोल्हापूर, ता. १२ : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, उपकुलसचिव विलास सोयम यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

13 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोडीची गोडी आजही कायम!

## १२५१ विद्यार्थ्यांनी पूर्ण केला प्रमाणपत्र अभ्यासक्रम


संदीप खांडेकर :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे घेतलेल्या मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम आजपर्यंत १२५१ विद्यार्थ्यांनी पूर्ण केला आहे. त्यातून मोडीची गोडी कायम असल्याची प्रचिती दिसून येते. मोडी लिपीचे वाचन असो किंवा तिचे लिप्यांतर या लिपीबद्दल नेहमीच आकर्षण राहिले आहे.

**"दहा दिवसीय मोडी लिपी प्रशिक्षण राबवणे उपक्रम चांगला असला तरी त्याची अधिकृतता किती, हे कळणे अवघड आहे. महिन्याच्या अभ्यासक्रमातून जे शिकता येते, ते दहा दिवसांत शिकता येते का, याचा विचार झाला पाहिजे. त्यामुळे पदवी स्तरावरील तीन व पदव्युत्तरच्या दोन वर्षांसाठी मोडीचा अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे.**
**- वसंत सिंघण,** मोडी लिपी तज्ज्ञ

**"विभागाने मोडी लिपीचा अभ्यासक्रम सुरू केल्याने अनेकांना ही लिपी शिकता आली. तिचे लिप्यांतर करणे त्यांना शक्य झाले. यापुढेही हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू राहणार आहे.**
**- डॉ. ए. एम. गुरव, प्रभारी संचालक,**
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

शिवकाळातील मोडी लिपीमधील कागदपत्रांचे वाचन हा कुतूहलाचा विषय राहिला आहे. जमा-खर्च, जमीन मोजणी, हुकूमनामा, आज्ञापत्र वतनासंदर्भातील महत्त्वाची माहिती, निवडे, गावगाड्याची रचना, आर्थिक व्यवहार यासह अन्य विषयांची माहिती मोडी लिपीत आहे. आजही काही कुटुंबात मोडी लिपीची कागदपत्रे जपून ठेवली आहेत. त्यांचे वाचन झाले नसल्याने नेमके त्यात काय म्हटले आहे, याविषयी ते अनभिज्ञ आहेत.








ही लिपी लोकांना कळावी, यासाठी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने २०१२-१३ पासून मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला. त्याला दरवर्षी चांगला प्रतिसादही मिळाला. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना ही लिपी कशी वाचावी, हे समजून आले. विशेष म्हणजे आजही ही लिपी शिकण्यासाठी विद्यार्थ्यांची ओढ कायम आहे.

तरुण भारत

# पदव्युत्तर प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी रविवारी घेण्यात आलेली पदव्युत्तर प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडली. २६६१ पैकी २११८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. एम. ए. मास कम्युनिकेशन, एम. सी. ए., एम. ए., एम. एस्सी. ज्युऑग्राफी, एम. एस. डब्ल्यू-रूरल कम्युनिटी डेव्हलपमेंट, एम. एस्सी. ज्युऑलॉजी, ॲग्रो केमिकल ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, स्टॅटिस्टिक्स अप्लाईड स्टॅटिस्टिक्स ॲन्ड इन्फरमेशन, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, बी. लिप., सायन्स ॲनड इन्फरमेशन सायन्स, एम. जे., बी. जे., आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.